शासन ज्ञापन क्रमांक- एलइएन-२६८७/१२५/प्र.क्र. १७६३/ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक २ नोव्हेंबर, २००६

विषय- जमीन-मुंबई उपनगर जिल्हा
मौजे कुर्ला, स. नं. ५, न.भू.क्र. १२८ मधील ३०५८.३० चौ.मी. जमिनीवर श्री संकटमोचन हनुमान शिव मंदिर विश्वस्त समिती या संस्थेचे असलेले अतिक्रमण नियमानुकूल करणेबाबत....

**शासन ज्ञापन :-**

श्री संकटमोचन हनुमान शिव मंदिर या नोंदणीकृत विश्वस्त संस्थेने मौजे कुर्ला, स. नं. ५, न.भू.क्र. १२८ मधील ३०५८.३० चौ.मी. जमिनीवर सन १९६६ मध्ये हनुमान मंदिर, शंकर मंदिर, गोशाळा, धुनी घर साधुसंतासाठी निवासस्थाने अशा प्रकारे धार्मिक प्रयोजनार्थ बांधकामे करुन केलेले अतिक्रमण नियमानुकूल करुन देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार पुढील प्रस्तावास शासन मंजूरी देत आहे :-

श्री. संकटमोचन हनुमान शिव मंदिर संस्था या संस्थेने मौजे कुर्ला, स. नं. ५, न.भू.क्र. १२८ मधील ३०५८.३० चौ. मी. जमिनीवर सन १९६६ मध्ये धार्मिक प्रयोजनार्थ केलेले अतिक्रमण महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम, १९७१ मधील नियम ४३ (ब) मधील तरतुदीनुसार पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजे संस्थेचे अतिक्रमण सन १९६६ मधील असल्याने त्या कालावधीपासून ते प्रकरणी आदेशाच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीसाठी त्या ३०५८.३० चौ. मी. जमिनीची सहाय्यक संचालक नगर रचना व मूल्यनिर्धारण विभाग यांनी निर्धारित केलेल्या सन १९६६ मधील बाजारभावाच्या एकूण किंमतीच्या २५ टक्के प्रमाणे प्रतिवर्षी भाडे आकारुन आणि त्यानंतर आदेशाच्या तारखेपासून पुढे ३० वर्षाकरीता या भाडेपट्टयात प्रत्येक १० वर्षात सुधारणा करुन शिघ्रसिध्द गणकानुसार जमिनीच्या प्रचलित बाजारभावाच्या एकूण रक्कमेवर १ जानेवारी रोजी अस्तित्वात असलेल्या भारतीय स्टेट बँकेच्या प्राईम लेंडींग रेट प्रमाणे होणा-या व्याजाच्या रक्कमे इतके (त्या त्या वेळी अस्तित्वात असलेल्या शासनाच्या धोरणाप्रमाणे) प्रतिवर्षी आगाऊ भाडे आकारुन आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम ५० (२) नुसार रुपये २,०००/- इतका दंड आकारुन तसेच नेहमीच्या अटी/शर्तीवर तसेच खालील अतिरिक्त अटीवर नियमानुकूल करुन देण्यात येत आहे.

**अटी :-** १) प्रस्तुत जमिनीची आदेशाच्या दिनांकाच्या वेळची व सन १९६६ मधील बाजारभावाची किंमत सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभागाकडून निर्धारीत करुन घेण्यात यावी व देय ठरणारी भाड्याची रक्कम वसूल करण्यात यावी.

२) सदर जमीन ही "विशेष औद्योगिक विभागात" समाविष्ट असल्याने जमिनीचा ताबा देण्यापूर्वी प्रतिग्रहित्यानी मंजूर विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील नियम ५७ नुसार, सदर जमीन "बिगर औद्योगिक" करुन घेण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांची पूर्व परवानगी मिळवावी.

कृ.मा.प...

US - 1331

Scanned by CamScanner

३) प्रतिग्राहीत्यास भाडेपट्टयाच्या दरात सुधारणा करण्यासंबंधात वेळोवेळी घेण्यात येणारे निर्णय मान्य व बंधनकारक असतील.

४) सदर ठिकाणी कायदा व सुव्यवस्था तसेच स्थानिक रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता मंदिर समितीने घ्यावी.

५) सदर मंदिराचे ठिकाण सार्वजनिक राहून मंदिर सर्व धर्म/जातींच्या लोकांसाठी खुले असावे. सदरची जबाबदारी मंदिर विश्वस्त समितीची राहील.

६) संस्थेस जमीन ज्या प्रयोजनार्थ देण्यात येत आहे, त्याच प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करण्यात यावा. तसेच जमिनीच्या प्रयोजनात शासनाच्या पुर्वपरवानगीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही.

७) संस्थेकडून कोणत्याही अटींचा भंग झाल्यास जमीन, त्यावरील बांधकामासह, शासन जमा करण्यात येईल.

२. सदरचे ज्ञापन, नगर विकास विभाग, गृह विभाग व वित्त विभाग यांनी दिलेल्या सहमतीच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( वि. सि. वखारे )
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा
प्रशासकीय इमारत,
बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१

प्रतिलिपी :-

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
२) जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख, पुणे
३) उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई
४) सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग, मुंबई उपनगर जिल्हा
५) महालेखापाल, (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई
६) महालेखपाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई
७) वित्त विभाग (व्यय-९), मंत्रालय, मुंबई
८) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) ज-३ कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा

क्र. सी/कार्या-२ डी/ जमिन/ एल- ६३७/२०११-
दिनांक : 31/12/२०११.

**वाचले :**

१. महसुल व वनविभाग, शासन क्र. एलइएन - २६८७/१२५/ प्र.क्र. १७६३/ ज- ३, दि. ०४/०१/२०११
२. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे पत्र क्र. सी/कार्या-२ डी/ जमिन मागणी/कावि- ४८५/११, दि. ०७/०४/२०११.
३. अध्यक्ष, श्री संकट मोचन हनुमान शिव मंदिर संस्थान यांचे दि. २१/०६/२०११ व दि. २८/११/२०११ चे पत्र.

**आदेश :**

मौजे- कुर्ला, स. नं. ५, न. भू. क्र. १२८ मधील ३०५८.३० चौ. मी. जमिनीवर श्री संकटमोचन हनुमान शिवमंदिर विश्वस्त समितीने केलेले १९६६ मधील अतिक्रमाण हे महाराष्ट्र जमिन महसूल (स.ज.वि.) नियम १९७१ मधील ४३ (ब) मधील तरतुदीनुसार भाडेपट्टयाची होणारी रक्कम आकारण्याच्या अटीवर दि. ०२/११/२००६ च्या ज्ञापनान्वये नियमित करण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार दि. ०२/११/२००६ च्या ज्ञापनानुसार होणारी भाडेपट्टयाची रक्कम भरण्याबाबत या कार्यालयाने संस्थेस कळविले असता, संस्थेने दि. ०४/०१/२००७ च्या पत्रान्वये भाडेपट्टयाची रक्कम संस्थेस भरणे शक्य नसल्याचे कळवून १९६६ ची किंमत विचारात घेऊन, जागा कायमस्वरुपी देण्याची विनंती शासनाकडे केली होती. संस्थेच्या सदर विनंतीचा साकल्याने विचार करुन दि. ०२/११/२००६ चे ज्ञापन अधिक्रमित करुन संस्थेचे सदर क्षेत्रावरील सन १९६६ मधील कलम ५० (२) व महाराष्ट्र जमिन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट) नियम १९७१ मधील नियम ४३ (अ) नुसार हे जागेच्या सन १९६६ च्या किंमतीच्या ५ पट इतकी रक्कम कब्जेहक्काची किंमत व त्यावर आतापर्यंत प्रचलित दराने होणारे व्याज व रु. २०००/- इतकी दंडाची रक्कम अशी एकूण रक्कम रु. ३९,४७,२००/- वसूल करुन नेहमीच्या अटी/ शर्तीवर, व खालील विशिष्ट अटींवर नियमित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**अटी :-**

१. संस्था सदर जमिन भोगवटदार वर्ग- २ म्हणून धारण करील.
२. शासनाच्या परवानगीशिवाय संस्थेस जमिन तारण/ गहाण ठेवता येणार नाही वा विक्री करता येणार नाही.
३. सदर जमिन ही विशेष औद्योगिक विभागात समाविष्ट असल्याने जमिनीचा तावा देण्यापूर्वी प्रतिग्रहित्यानी मंजूर विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील नियम ५७ नुसार, सदर जमिन बिगर औद्योगिक करुन घेण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांची पूर्व परवानगी मिळवावी.
४. सदर ठिकाणी कायदा व सुव्यवस्था तसेच स्थानिक रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता मंदिर समितीने घ्यावी.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय ,प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू ) मुंबई-५१
कार्यालय 91-26556799 Fax : 6556805 E mail :- Mumbai Suburban Collector@mah.gov.in

Scanned by CamScanner

५. सदर मंदिराचे ठिकाण सार्वजनिक राहून मंदिर सर्व ~~धर्म/जातींच्या~~ लोकांसाठी खुले असावे. सदरची जबाबदारी मंदिर विश्वस्त समितीची राहील.
६. संस्थेस जमिन ज्या प्रयोजनार्थ देण्यात येत आहे त्याच प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करण्यात यावा. तसेच जमिनीच्या प्रयोजनात शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही.
७. संस्थेकडून कोणत्याही अटीचा भंग झाल्यास जमिन, त्यावरील बांधकामासह शासन जमा करण्यात येईल.
८. प्रस्तुत मिळकतीचे नगर रचना व मुल्यनिर्धारण विभागाने अंतिम मुल्यांकन केल्यानंतर येणारे अंतिम मुल्यांकन व तात्पुरत्या मुल्यांकनामधील फरकाची रक्कम प्रचलित दराने व्याजासह भरणा करावी लागेल.

**जिल्हाधिकारी**
**मुंबई उपनगर जिल्हा**

**प्रति,**
**श्री संकट मोचन हनुमान मंदिर शिवशंकर संस्थन**
**मुकुंद कंपनी जवळ, एल. बी. एस. मार्ग,**
**मुंबई- ४०० ०७०.**

**प्रत :**

१. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर
२. शासन
३. अपर जिल्हाधिकारी, अतीनिष्का. मुंबई उपनगर जिल्हा
४. तहसिलदार, कुर्ला यांच्याकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.
 २/- प्रकरणी प्रश्नांकित जमिनीचा ताबा आदेशातील अट क्र. ३ ची पूर्तता केल्याची खात्री करुन श्री संकट मोचन हनुमान शिव मंदिर विश्वस्त समिती यांच्याकडे द्यावा.
४. नगर भूमापन अधिकारी, घाटकोपर यांचेकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.
 २/- प्रकरणी प्रश्नांकित जमिनीचा ताबा आदेशातील अट क्र. ३ ची पूर्तता केल्याची खात्री करुन श्री संकट मोचन हनुमान शिव मंदिर विश्वस्त समिती यांच्याकडे द्यावा.

**जिल्हाधिकारी**
**मुंबई उपनगर जिल्हा**

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय ,प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१
कार्यालय 91-26556799 Fax : 6556805 E mail :- Mumbai Suburban Collector@mah.gov.in

Scanned by CamScanner